मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 25 ऑगस्ट 2024 | पान- 1

# नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क रहावे; शेखर सिंह यांचे आवाहन

## पिंपरी चिंचवड शहर परिसरात तसेच धरण क्षेत्रात घाटमाथ्यावर मुसळधार पाऊस सुरु : शहरातून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीच्या पाणी पातळीत वाढ होत आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहर परिसरात तसेच धरण क्षेत्रात विशेषत: घाटमाथ्यावर मुसळधार पाऊस सुरू असून धरणातून पाण्याचा विसर्ग केला जात आहे. त्यामुळे शहरातून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी आपत्कालीन यंत्रणेला दक्ष राहण्याचे आदेश दिले असून नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांनी सतर्क रहावे, असे आवाहन देखील आयुक्त सिंह यांनी केले आहे.

आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी अतिरिक्त आयुक्तांवर क्षेत्रीय कार्यालयनिहाय समन्वय ठेवण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. यामध्ये अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्याकडे क, इ आणि फ क्षेत्रीय कार्यालय, विजयकुमार खोराटे यांच्याकडे ड, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालय तर चंद्रकांत इंदलकर यांच्याकडे अ आणि ब क्षेत्रीय कार्यालयाशी समन्वय ठेवण्याची जबाबदारी दिली आहे. सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीला तात्काळ प्रतिसाद देऊन कार्यवाही करण्याचे निर्देश आयुक्त सिंह यांनी दिले आहेत.

नदीकाठी बचाव कार्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवावी, शीघ्र प्रतिसाद पथकांनी दक्ष रहावे, वैद्यकीय पथक सज्ज ठेवावे, मध्यवर्ती नियंत्रण कक्षाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवून आवश्यक कार्यवाही करावी, सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी दक्ष राहून त्यांच्या अखत्यारीतील जबाबदारी समन्वयाने पार पाडावी, असे निर्देश देखील आयुक्त सिंह यांनी दिले. आवश्यकता पडल्यास तात्काळ मदतीसाठी लष्कर आणि एनडीआरएफला शहरात पाचारण करण्यासाठी पूर्वसूचना देण्याबाबत आपत्कालीन विभागाला सूचना दिल्या आहेत.

ज्या भागात पाणी शिरते त्या भागातील नागरिकांना पाणी पातळीबद्दल प्रत्यक्ष तसेच ध्वनिक्षेपकाद्वारे सतर्क राहण्याबाबत तात्काळ सूचना द्यावी, आपत्कालीन प्रसंगी पूरबाधितांना निवारा केंद्रामध्ये स्थलांतरित करावे, धरण कक्ष तसेच पोलीस यंत्रणेसमवेत समन्वय ठेवावा, आदी सूचना आयुक्त सिंह यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. निवारा केंद्रासाठी समन्वयक म्हणून स्वतंत्र अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या असून त्यांना आवश्यक सूचनादेखील देण्यात आल्या आहेत. मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी दक्षता बाळगावी, नदीच्या पाणी पातळीत वाढ होण्याची शक्यता असून नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांनी सतर्क रहावे, असे आवाहन आयुक्त शेखर सिंह यांनी केले आहे.



### या अधिकाऱ्यांवर जबाबदारी

» आपत्कालीन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर परिस्थिती हाताळण्यासाठी अतिरिक्त आयुक्तांवर क्षेत्रीय कार्यालय निहाय समन्वय ठेवण्याची जबाबदारी सोपवली आहे. यामध्ये अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांच्याकडे क, इ आणि फ क्षेत्रीय कार्यालय, विजयकुमार खोराटे यांच्याकडे ड, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालय तर चंद्रकांत इंदलकर यांच्याकडे अ आणि ब क्षेत्रीय कार्यालयाशी समन्वय ठेवण्याची जबाबदारी दिली आहे. सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीला तत्काळ प्रतिसाद देऊन कार्यवाही करण्याचे निर्देश आयुक्त सिंह यांनी दिले आहेत.

> “निवारा केंद्रासाठी समन्वयक म्हणून स्वतंत्र अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत. त्यांना आवश्यक सूचना देखील देण्यात आल्या आहेत. मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी दक्षता बाळगावी. नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होण्याची शक्यता असून नद्यांच्या काठावरील रहिवाशांनी सतर्क राहावे.
> - शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.

# मावळच्या बाल गायीके ने गाठली छोटे उस्तादची “सेमी फायनल”

## बाल कलाकार अवनी परांजपे हिची कामगिरी : तळेगाव व मावळचे नाव मनोरंजन विश्वात गाजतेय

**पिंपरी | प्रतिनिधी**



गीत बागडे बरोबर “उगवला चंद्र पुनवेचा हे नाट्यगीत, डोल डोलते वाऱ्यावर हे कोळीगीत, तराणा , सरगम आणि पाश्चात्य फ्युजन असलेल्या या जुगलबंदीचे परीक्षक सचिन पिळगावकर, वैशाली सामंत आणि आदर्श शिंदे यांनी जागेवर उभे राहून मानवंदना देऊन त्यांच्याजवळ जाऊन भरभरून कौतुक केले. ओपी परफॉर्मन्सचा पुष्पवर्षाव झाला. आवाज वाढव अशी प्रोत्साहन पर आरोळी मिळाली. सचिन पिळगावकर यांनी त्यांची स्पेशल शंभर रुपयाची नोट देऊन दोघींचे कौतुक केले. घंटा नादही केला. आणि जुगलबंदीतील दोन्ही कलाकार सेमी फायनल मध्ये पोहोचले आहेत,

गीत बागडे बरोबर “उगवला चंद्र पुनवेचा हे नाट्यगीत, डोल डोलते वाऱ्यावर हे कोळीगीत, तराणा , सरगम आणि पाश्चात्य फ्युजन असलेल्या या जुगलबंदीचे परीक्षक सचिन पिळगावकर, वैशाली सामंत आणि आदर्श शिंदे यांनी जागेवर उभे राहून मानवंदना देऊन त्यांच्याजवळ जाऊन भरभरून कौतुक केले. ओपी परफॉर्मन्सचा पुष्पवर्षाव झाला. आवाज वाढव अशी प्रोत्साहन पर आरोळी मिळाली. सचिन पिळगावकर यांनी त्यांची स्पेशल शंभर रुपयाची नोट देऊन दोघींचे कौतुक केले. घंटा नादही केला. आणि जुगलबंदीतील दोन्ही कलाकार सेमी फायनल मध्ये पोहोचले आहेत, असा वेगळा निर्णय दिला.

अवनी परांजपे ही कलापिनीच्या वातावरणात घडलेली बालकलाकार अंजली कराडकर यांच्याकडून गायन कीर्तन, नाट्यभिनय यांचे शिक्षण घेत आहे. कलापिनीचे बालनाट्य शिबिर, दिवाळी पहाट अशा कार्यक्रमात अवनीचा सहभाग असतो. कलापिनी आयोजित मनाचे श्लोक पाठांतर स्पर्धा, बालकथा नाट्य स्पर्धा, यात अवनीने प्रथम पारितोषिके मिळवली आहेत.

अवनी व अंजली कराडकर यांची बेल्जियम आणि नेदरलँड्स या ठिकाणी कीर्तने झाली आहेत. अवनी कथक नृत्याचेही शिक्षण घेत आहे, भारतीय विद्या भवन च्या सुलोचना नातू विद्या मंदिरात इयत्ता नववी मध्ये ती शिकत आहे. आपले गायन कौशल्य, गुणवत्ता, आणि रसिकांचे पाठबळ आशीर्वाद यामुळे तळेगावचे व मावळचे नाव गाजवेल असा विश्वास वाटतो.

# ...अन् मुसळधार पावसातही सुप्रिया सुळे बोलत राहिल्या!

**मुसळधार पावसाच्या धारा अंगावर झेलत खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्यात महिलांवरील वाढत्या अन्याय-अत्याचाराच्या घटनेवरून त्यांनी राज्य सरकावर जोरदार टीका केली.**

**पुणे | प्रतिनिधी**

मुसळधार पावसाच्या धारा अंगावर झेलत सुळे यांनीही आपल्या भाषणास सुरवात केली. राज्यात महिलांवरील वाढत्या अन्याय-अत्याचाराच्या घटनेवरून त्यांनी राज्य सरकावर जोरदार टीका केली.

गुरुवारी सकाळपासूनच पावसाने जोर धरला होता, अशा मुसळधार पावसातच पुणे स्टेशन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर राजकीय पक्षांचे हजारो कार्यकर्ते, पदाधिकारी, नेते शनिवारी मूक आंदोलनास बसले होते. खुद्द शरद पवार यांच्यासारखे वरिष्ठ नेतेही भर पावसातील या मूक आंदोलनाला उपस्थित होते.

त्याचवेळी कार्यकर्त्यांसमवेत बसलेल्या खासदार सुप्रिया सुळे उठल्या. डोक्यावर पदर घेत, मुसळधार पावसात भिजत त्या बोलू लागल्या, तितक्याच पोटतिडकीने महिला अत्याचाराविरुद्ध उपस्थितांशी संवाद साधत राहिल्या !

भर पावसात बोलताना सुप्रिया सुळे यांनी सांगितले की, मोठ्या आंदोलनाची ही फक्त सुरुवात आहे, आपणास सुरक्षितेसाठी मोठे काम करायचे आहे. गाव, वाडी, वस्तीवर जाऊन काम करायचे आहे. दौंडमध्ये काल मी गेले. त्या ठिकाणी घडलेली घटना पाच ते सहा वर्षांपूर्वीची आहे. आता लोक पुढे येत आहे. त्यामुळे त्या पालकांना धीर देण्याची गरज आहे. कोणत्याही कार्यकर्त्यांनी त्या मुलींच्या घरी जाऊ नये. त्यांची ओळख बाहेर येऊ देऊ नये. आपण महाराष्ट्रातील मुलींच्या सुरक्षेसाठी कामाला लागू या. तसेच जोपर्यंत त्या व्यक्तीला फाशी होत नाही, तोपर्यंत महाविकास आघाडीचे कार्यकर्ते स्वस्थ बसणार नाही. बदलापूर आंदोलनात बाहेरची लोक होती, असे सत्ताधारी म्हणत होते, मात्र बाहेरचे लोक असले तरी घटनेचा निषेध महत्वाचा आहे.

बदलापूर येथील घटनेच्या पार्श्वभूमीवर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर शनिवारी सकाळी दहा वाजता महाविकास आघाडी व घटक पक्षांच्या मूक आंदोलनास सुरवात झाली. सकाळपासून सुरु असलेला पाऊस काही वेळ उसंत घेण्याची शक्यता वाटत होती, मात्र त्याऐवजी पावसाचा जोर चांगलाच वाढला.

त्याचवेळी शरद पवार, सुप्रिया सुळे यांच्यासह महाविकास आघाडीतील वरिष्ठ नेत्यांनी काळ्या फिती लावत या आंदोलनात सहभाग घेतला. पक्षाचे शहराध्यक्ष, प्रमुख नेते, माजी आमदार यांची भाषणे पावसात सुरू होती. सुळे यांनी थेट पक्षाच्या कार्यकर्त्यांसमवेत पावसात भिजत त्या आंदोलनात सहभागी झाल्या. मूक आंदोलन झाल्यानंतर तिन्ही पक्षातील नेत्यांनीही भर पावसात भाषणे केली.



### ...शरद पवार अन् पाऊस, तिसऱ्यांदा जुळला योग !

» साताऱ्यामध्ये १८ ऑक्टोबर २०१९ मध्ये भर पावसात शरद पवार यांनी केलेले भाषण, त्यानंतर पुन्हा २७ नोव्हेंबर २०२३ रोजी नवी मुंबई येथे झालेल्या एका कार्यक्रमात पवार यांच्या भाषणावेळी पावसाने लावलेली हजेरी, या दोन घटनांवरून पवार व पाऊस यांचे अनोखे नाते पुढे आले होते. शनिवारी (ता.२४) पुण्यात झालेल्या मूक आंदोलनास पवार यांनी हजेरी लावली. मुसळधार पावसातही ते आंदोलनासाठी बसून होते. त्यामुळे तिसऱ्यांदा पवार व पावसाचा अनोखा योग जुळून आल्याचे चित्र पाहायला मिळाले.

### महिला सुरक्षेची शपथ

» आंदोलनाच्या समारोपावेळी पवार यांनी उपस्थित हजारो कार्यकर्त्यांना शपथ दिली. महिलांच्या सुरक्षेसंबंधीची ही शपथ होती. "मी स्त्रियांवर होणारा हिंसाचार, कधीही खपवून घेणार नाही', अशा स्वरूपातील या शपथेमध्ये महिलांच्या सुरक्षितता, शहर, राज्य व देशातील सुरक्षित वातावरण व भयमुक्त स्थिती बनविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचा उल्लेख करण्यात आला होता.

### आंदोलनाच्या ठिकाणीही रंगले "मानापमान नाट्य'

» महाविकास आघाडीचे आंदोलन असल्याने तेथे तिन्ही पक्षांचे नेते, कार्यकर्ते उपस्थित होते. मात्र, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कार्यकर्ते अगोदर आल्याने त्यांनी मोक्याची जागेवर बसण्यास प्राधान्य दिले. हा प्रकार कॉंग्रेस नेत्यांच्या पचनी पडला नाही. त्यांनी याबाबत नाराजी व्यक्त केली. त्याची प्रशांत जगताप यांनी गांभीर्याने दखल घेत, आपल्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना विनंती करून, कॉंग्रेसच्या नेत्यांना जागा उपलब्ध करून देत मानापमान नाट्यावर पडदा टाकला.

# पुणे जिल्ह्यातील पौड जवळ एक हेलिकॉप्टर क्रॅश; खराब हवामानामुळे दुर्घटना

**पौड जवळच घोटावडे या ठिकाणी ही दुर्घटना घडली खराब हवामान आणि पाऊस यामुळे हे हेलिकॉप्टर क्रॅश झालं असावं असा अंदाज व्यक्त केला जात आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील पौड जवळ एक हेलिकॉप्टर क्रॅश झाल्याची माहिती समोर आली आहे. ही दुर्घटना खराब हवामानामुळे घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. हे हेलिकॉप्टर कोणाचं आहे, याबाबतची माहिती अद्याप मिळालेली नाही. यामध्ये 4 प्रवासी होते, अशी माहिती घटनास्थळी असलेल्या प्रत्यक्षदर्शींनी दिली आहे, तर अद्याप त्या प्रवाशांबाबतची माहिती समजू शकलेली नाही.

ही दुर्घटना अत्यंत भीषण आहे. पौड जवळच असलेल्या घोटावडे या ठिकाणी ही दुर्घटना घडली आहे. खराब हवामान आणि पाऊस यामुळे हे हेलिकॉप्टर क्रॅश झालं असावं असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या हेलिकॉप्टरमध्ये पायलटसोबतच 4 जण असल्याची माहिती आहे, ते यामध्ये जखमी झाले आहेत. या घटनेचं वृत्त समजताच परिसरात मोठी गर्दी झाली आहे. त्यातील २ जण गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे.

पोलिस देखील घटनास्थळी पोहोचले आहेत, या घटनेनंतर घटनास्थळी स्थानिकांनी धाव घेतली, दरम्यान ही दुर्घटना कशी घडली. मात्र, पावसामुळे आणि खराब हवामानामुळे घटना घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली. तर या हेलिकॉप्टरमध्ये काही तांत्रिक बिघाड झाला होता तपास करण्यात येईल हेलिकॉप्टर कोसळत असल्याचे दृश्य सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे.



### काय घडले नेमके?

» मुळशी तालुक्यातील कोंढावळे या ठिकाणी ही दुर्घटना घडली आहे. हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे ही दुर्घटना घडली. या दुर्घटनेमध्ये 4 जण जखमी झाले आहेत. हॉटेल गारवा लागत शेतात हेलिकॉप्टर कोसळलं आहे. हेलिकॉप्टर कोसळल्यानंतर गावातील लोक आणि गारवा हॉटेलचे मालक आणि कर्मचारी तातडीने मदतीसाठी धावले. AW 139 असे अपघात झालेल्या हेलिकॉप्टरचं नाव आहे. सदर हेलिकॉप्टर जुहू मुंबई इथून हैदराबाद जात होतं. ग्लोबल हेक्ट्रा या कंपनीचं हे हेलिकॉप्टर असल्याचे समजत आहे. हेलिकॉप्टरचे कॅप्टन आनंद हे जखमी झाले असून त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं आहे

### घटनेबाबत प्रत्यक्षदर्शींनी दिली माहिती

» हेलिकॉप्टर काही वेळ घोटावड्याच्या दिशेने आकाशात घिरट्या घालत होतं. अचानक ते खाली पडल्याचा मोठा आवाज आला. त्यामध्ये चार जण होते, 2 जण गंभीर जखमी आहेत. पोलिस देखील घटनास्थळी दाखल झाले आहे. स्थानिक आणि आजुबाजूचे लोक मदतीसाठी आले आहे, पायलट बोलण्याच्या मनस्थितीत नाही. त्यांना उपचारांसाठी रूग्णालयात नेलं जाईल. त्या ठिकाणी 200-300 ग्रामस्थ घटनास्थळी दाखल झाले आहेत. कोसळलेल्या हेलिकॉप्टरच्या आजूबाजुला न जाण्याचं आवाहन पायलटनी नागरिकांना केलं आहे. कारण या हेलिकॉप्टरचा कोणत्याही क्षणी स्फोट होऊ शकतो, असंही त्यांनी म्हटलं आहे.

# बदलापूर घटनेनंतर आता शाळांत पोलिसांच्या बैठका

## सीसीटीव्ही बसवण्याची तसेच कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी करण्याची सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

बदलापूर घटनेचे संतप्त पडसाद देशभर उमटले आहेत. दरम्यान, पिंपरी-चिंचवड पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून शहरातील शाळांमध्ये जाऊन तसेच पोलीस ठाण्यात बैठका घेण्यास सुरुवात केली आहे. या व्यतिरिक्त हद्दीतील शांतता आणि मोहल्ला कमिटीच्याही बैठका घेण्यात आल्या आहेत. यावेळी पोलिसांनी शहरात शांतता राखण्यासोबतच शाळेतील मुख्याध्यापकांसह शिक्षकांना मुलांच्या सुरक्षितेबाबत आवश्यक सूचना केल्या.



बदलापूर येथे दोन मुलींवर शाळेतील एका कर्मचाऱ्याने अत्याचार केले. देशभरातील पालकांनी यावर संतप्त प्रतिक्रिया दिल्या. घटनेचे गांभीर्य ओळखून महाराष्ट्र शासनाने याबाबत एक 'जीआर' काढला आहे. त्यानुसार, शाळा परिसरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. यासाठी एक महिन्याचा अवधी देण्यात आला आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड पोलिसांनी शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षकांसोबत बैठका घेऊन जीआर प्रमाणे अंमलबजावणी करण्याच्या सूचना केल्या. तसेच, शाळेत कंत्राटी पद्धतीने असलेल्या कामगारांची चारित्र्य पडताळणी तत्काळ करून घेण्यास सांगितले. याव्यतिरिक्त ठाणे स्तरावर शांतता व मोहल्ला कमिटीच्या सदस्यांना बोलावून हद्दीमध्ये शांतता कायम राखण्यासाठी खबरदारी घेण्यास सूचित केले.

### शिक्षकांनीही मांडल्या व्यथा

» पोलिसांनी शाळेतील शिक्षकांना मुलांच्या सुरक्षिततेबाबत सूचना केल्या. यावेळी शिक्षकांनीही शाळेबाहेर घिरट्या घालणाऱ्या टवाळखोरांच्या तक्रारी केल्या. तसेच, शाळा सुटताना आणि भरताना पोलिसांची नियमित गस्त व्हावी, अशी मागणी केली.

### दामिनी पथकांना 'अलर्ट'

» पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात ३३ दामिनी पथके सक्रिय आहेत. रस्त्याने चालणाऱ्या महिलांसोबत शाळा, कॉलेजच्या मुलींच्या सुरक्षेची जबाबदारी दामिनी पथकावर आहे. त्यानुसार, दामिनी पथके शाळांना नियमित भेटी देत असतात. शाळेत असलेल्या तक्रार पेट्या उघडून विद्यार्थिनींच्या समस्येचे निराकरणही केले जाते. यापूर्वी अनेक विद्यार्थिनींच्या तक्रारींचे दामिनी पथकाने समाधान केल्याची नोंद आहे. दरम्यान, बदलापूर घटनेच्या पार्श्वभूमीवर दामिनी पथकांना अधिक अलर्ट राहण्याच्या सूचना वरिष्ठ पातळीवरून करण्यात आल्या आहेत.

# महापालिकेच्या वतीने 33 युवांना प्रशिक्षणार्थी नियुक्तीपत्र प्रदान

## आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते युवांना नियुक्ती प्रमाणपत्र देऊन या योजनेची प्रत्यक्ष सुरुवात

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते ३३ युवांना नियुक्ती प्रमाणपत्र देऊन या योजनेची प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली.



राज्य शासनाच्या वतीने राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची नोकरी मिळविण्याची तसेच उद्यमशीलता क्षमता वाढविण्यासाठी "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना" सुरु करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने आज पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विविध विभागाकडील कामकाजासाठी शेखर सिंह यांच्या हस्ते ३३ युवांना प्रशिक्षणार्थी नियुक्ती प्रमाणपत्र देण्यात आले. हा कार्यक्रम महापलिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात संपन्न झाला.

यावेळी शहर अभियंता मकरंद निकम, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, मोरवाडी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य शशिकांत पाटील, उप आयुक्त विठ्ठल जोशी, विशेष अधिकारी किरण गायकवाड, समाज विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, सहाय्यक आयुक्त अजिंक्य येळे, कार्यकारी अभियंता नितीन देशमुख, माहिती तंत्रज्ञान अधिकारी अनिता कोटलवार, प्रशासन अधिकारी गोरखनाथ लिमन, समाज सेवक संतोषी चोरघे, नम्रता रणसिंग, विशाल शेडगे यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी, युवा प्रशिक्षणार्थी आणि त्यांचे पालक उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थायी आस्थापनेवरील एकूण पदसंख्येच्या ५ टक्के जागा मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत तात्पुरत्या कालावधीसाठी भरण्यात येत आहेत. त्यानुषंगाने महापालिकेच्या विविध विभागकडील मागणीनुसार एकूण ५७५ जागांवर युवा प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे. यामध्ये फिल्ड सर्वे एन्युमरेटर, माळी, मल्टी टास्किंग स्टाफ, स्थापत्य अभियंता, आरोग्य विषयक कामकाज, वायरमन, संगणकीय कामकाज, प्रशासकीय कामकाज, कार्यालयीन कामकाज अशा विविध कामकाजाचे अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे. आज फिल्ड सर्वे एन्युमरेटर या कामकाजासाठी ३३ युवांना नियुक्ती देण्यात आली.

यामध्ये नागिनी तेलंग, विशाल मोरे, स्वप्नील अवारे, आकाश पोतदार, मानसी बिराजदार, ऋतुजा बोंबले, शितल चव्हाण, निरंजन थोरात, सतीश भोसले, संदेश खंदारे, धार्मिक पटेल, सचिन चिकणे, मयुर रंगारी, अनिरूद्ध आवाळे, आकांक्षा नवरत्ने यांना प्रातिनिधीक स्वरूपात आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.

### युवक आणि युवतींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे - आयुक्त

» तसेच येत्या सोमवार, २६ ऑगस्ट २०२४ रोजी मोरवाडी येथील दिव्यांग भवन येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या वतीने आणि कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, पुणे यांच्या सहकार्याने भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात महापालिकेचे विविध विभाग सहभागी होऊन मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत युवकांना प्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देणार आहेत. मोठ्या संख्येने युवक आणि युवतींनी या रोजगार मेळाव्यात सहभागी होऊन संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त शेखर सिंह यांनी केले आहे.

# बाणेरमध्ये सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची बैठक संपन्न

## गणेश मंडळांनी सीसीटीव्ही, सांस्कृतिक कार्यक्रम आणि पारंपरिक वाद्यांवर भर द्यावा : मंत्री चंद्रकांत पाटील

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी गणेशोत्सव गणेश मंडळांनी सामाजिक भावनेतून शांततेत आणि उत्साहात साजरा करावा, असे आवाहन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. गणेशोत्सव काळात मंडळांनी मंडपात सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करावे, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन आणि विसर्जन मिरवणुकीत पारंपरिक वाद्यांनाच प्राधान्य द्यावे असेही आवाहन त्यांनी यावेळी केले.



चतु:शृंगी पोलीस ठाणे व पुणे महानगरपालिका क्षेत्रीय कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बाणेर मधील साफा बॅन्क्वेट हॉल येथे आयोजित सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते. बैठकीस पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेशकुमार, पुणे शहर सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव, वाहतूक शाखेचे उपायुक्त अमोल झेंडे, महावितरणचे अधीक्षक अभियंता सयाजीराव गायकवाड, महापालिका उपायुक्त अविनाश सपकाळ, औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त गिरीश दाबकेकर यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

मंडळांच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधताना मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, स्वातंत्र्यपूर्व काळात लोकमान्य टिळकांनी समाजाच्या एकजुटीसह गरजू लोकांना मदत होईल, या भावनेतून सार्वजनिक गणेशोत्सव ही संकल्पना मांडली. त्यामुळे गणेशोत्सव मंडळांनीही उत्सव काळात जनजागृतीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे, त्यासाठी आपल्या देखाव्यांमधून महिला सुरक्षा, राष्ट्रीय सुरक्षा असे विषय साकारावेत.

गणेशोत्सव काळात कोणतेही अनुचित प्रकार घडू नयेत, यासाठी मंडळांनी आपल्या मंडपात सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करणे आवश्यक आहे. तसेच, जनजागृतीसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेदेखील आयोजन करावे. त्यासोबतच ध्वनिप्रदूषण टाळण्यासाठी मिरवणुकीत पारंपरिक वाद्यांच्या वापरावर भर दिला पाहिजे. या तिन्ही गोष्टींसाठी मंडळांना सर्वतोपरी मदत करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी मंडळाच्या कार्यकर्त्यांना गणेशोत्सव शांततेत आणि उत्साहात साजरा करण्याचे आवाहन केले. कायद्याचे पालन करणाऱ्या गणेश मंडळांना सलग पाच वर्षे परवानगी देण्याचे निर्देश मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत. त्यामुळे गतवर्षी परवानगी घेतलेल्या मंडळांना पुन्हा परवानगीची गरज नाही. मात्र, परवानगी घेताना मंडळांनी नियम व अटींचे पालन करणे आवश्यक आहे. मंडळांनी महिलांची सुरक्षेसाठी उपाययोजना कराव्यात. तसेच अनुचित प्रकार टाळण्यासाठी उत्सव काळात मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सजग रहावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

पोलीस उपायुक्त जाधव यांनी बैठकीच्या सुरुवातीला प्रास्ताविक करताना चतु:शृंगी पोलीस ठाण्याच्या हद्दीत २५० गणेश मंडळे असून गणेशोत्सवाच्या अनुषंगाने मंडळांच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधल्याची माहिती दिली. गणेशोत्सवासाठी पोलीस दलाचे योग्य नियोजन केले असल्याचे त्यांनी सांगितले.

# कोंढव्यातील गंगाधाम-शत्रुंजय रस्ता रखडला

## आठ महिने झाल्यानंतरही काकडे वस्तीजवळील काम ठप्पच : पालिकेकडे तक्रार करून नाही उपयोग

**पुणे | प्रतिनिधी**

कोंढव्यातील गंगाधाम-शत्रुंजय रस्त्याचे काकडे वस्तीजवळील काम ठप्प झाले आहे. त्यामुळे गेल्या आठ महिन्यांपासून या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना सतत होणाऱ्या मोठ्या वाहतूक कोंडीमुळे सतत मनस्ताप सहन करावा लागत आहे. या संदर्भात महापालिकेकडे ढीगभर तक्रारी करूनही यावर कोणतीही प्रभावी उपाययोजना करण्यात आलेली नाही. येथील समस्या सुटण्याऐवजी अधिकच चिघळली आहे.



या परिसरातील पायाभूत सुविधा सुधारण्याच्या उद्देशाने सुरू झालेले हे काम रखडले आहे. त्यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. अनेक कार्यालये, शाळा आणि निवासी गृहप्रकल्प असलेल्या या भागातील रस्त्यावर मोठी रहदारी असते. शाळा, कार्यालये सुटल्यावर नेहमी वाहतूक कोंडी होत आहे. एकेकाळी सुटसुटीत अन् सोयीच्या असलेल्या या रस्त्यावर सध्या सतत होत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांना रोज अग्निदिव्याला सामोरे जावे लागत आहे.

येथील रहिवाशांनी महापालिकेकडे तक्रार अर्जांद्वारे वारंवार दाद मागून, या समस्येकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, त्यांच्या तक्रारीकडे महापालिका प्रशासन कानाडोळा करत आहे. येथील कामात कोणतीही ठोस प्रगती झालेली दिसत नाही. दीर्घकाळ रेंगाळल्यामुळे ही समस्या आता तीव्र झाली आहे. मात्र, तक्रारदारांच्या सततच्या उपेक्षेमुळे महापालिकेविरुद्ध व्यापक नाराजी आणि जनक्षोभ निर्माण झाला आहे. रोजच भेडसावत असलेली ही समस्या सोडवण्यात महापालिका सपशेल अपयशी ठरली आहे. येथे होत असलेल्या कोंडीमुळे प्रवाशांना आपापल्या नियोजित ठिकाणी पोहोचण्यास विलंब तर होत आहेच, परंतु या भागातील आर्थिक उलाढालीवरही प्रतिकूल परिणाम होत आहे. येथील दुकाने, व्यावसायिक आस्थापनांकडे ग्राहक वाहतूक समस्येमुळे कमी प्रमाणात जात आहेत. कोंडीला तोंड द्यावे लागू नये म्हणून या रस्त्याच्या परिसराकडे येण्यास ग्राहक टाळाटाळ करू लागले आहेत. व्यापाऱ्यांनाही त्यांच्या व्यवसायासाठी आवश्यक वाहतूक करण्यास अडचणी येत आहेत. येथील शाळांना विद्यार्थ्यांची वाहतूक करण्यास अडथळे येत आहेत. त्यामुळे ही समस्या कठीण बनली आहे.

कोंढव्यातील पीजीकेएम स्कूलच्या मुख्याध्यापिका प्राजक्ता भिडे यांनी सांगितले की, आमच्या शाळेलगतच्या रस्त्याचे काम गेल्या वर्षभरापासून सुरू आहे. हा रस्ता अजून पूर्ण का झाला नाही, ही आमच्यासाठी मोठी चिंतेचीच बाब आहे. आमच्या शाळेत १४०० विद्यार्थी आहेत. रोजच त्यांच्या स्कूलव्हॅन या कोंडीत अडकत आहेत. त्यामुळे त्यांना शाळेत पोहोचण्यास विलंब होऊन मोठी गैरसोय होत आहे. त्यात शाळेच्या सीमाभिंतीजवळ काही जणांनी राडारोडा, कचरा टाकण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे प्रश्न निर्माण होत आहेत. येथे काही दिवसांपूर्वी दोन जणांना प्राण गमवावे लागले आहेत. त्यामुळे महापालिका प्रशासनाने ही समस्या सोडवण्यासाठी तातडीने पावले उचलावीत.

### महापालिका म्हणते, पावसामुळे काम ठप्प

**» पुणे महापालिकेचे रस्ता विभागाचे मुख्य अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी सांगितले की, हा रस्ता डांबरी आहे. आम्ही त्यावर खडीचा थर दिला आहे. मात्र सध्या होत असलेल्या पावसामुळे सर्वत्र ओल आहे. हा थर नीट सुकल्याशिवाय आम्ही त्यावरील थराचे काम करू शकत नाही. अजून थरांचे आवश्यक काम बाकी आहे. पावसामुळे ते ठप्प झाले आहे. पाऊस थांबल्यानंतर येत्या दोन-तीन महिन्यांत हे काम पूर्ण करू.**